**ठळक बातम्या**

- भारताला उद्योग आणि ज्ञानाचं जागतिक केंद्र बनवावं असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन

- रामोशी-बेरड-बेडर समाजासाठी ‘राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळा’च्या माध्यमातून कर्ज योजना आणल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

- उपराष्ट्रपती पदासाठीच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान

- दहशतवादाच्या कटाच्या तपासादरम्यान महाराष्ट्रासह पाच राज्यातल्या २२ ठिकाणी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे छापे

**आणि**

- आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारत अजिंक्य

**<><><><>**

भारताला पुन्हा एकदा उद्योग आणि ज्ञानाचं जागतिक केंद्र बनवावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज नवी दिल्लीत अभियांत्रिकी निर्यात प्रोत्साहन परिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. देशाची अर्थव्यवस्था सक्षम आणि स्वावलंबी असावी, तसंच देशाच्या निर्यातीत वाढ होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

देशाच्या योगदानात लघु, मध्यम आणि सूक्ष्म उद्योगांचं योगदान महत्त्वाचं असल्याचं त्यांनी सांगितलं.

- **- होल्ड बाईट मुर्मू - -**

जागतिक स्तरावर अर्थव्यवस्था अस्थिर झाली तरी त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ नये, इतकी अर्थव्यवस्था मजबूत असावी, जागतिक व्यापारातल्या आव्हानांचं रुपांतर संधीमधे करायला हवं, असं राष्ट्रपती म्हणाल्या. जागतिक अर्थव्यवस्था आणि व्यापार यांच्यात साततत्याने बदल होत आहेत, या पार्श्वभूमीवर अभियांत्रिकी निर्यात प्रोत्साहन परिषदेची भूमिका महत्त्वाची आहे, असंही त्या म्हणाल्या.

**<><><><>**

राज्यातल्या रामोशी-बेरड-बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ‘राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळा’च्या माध्यमातून राज्य शासनाने कर्ज योजना आणल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. ते काल आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या २३४व्या जयंतीनिमित्त पुणे जिल्ह्यात पुरंदर तालुक्यातल्या भिवडी इथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. रामोशी-बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. पोलीस भरतीसाठी विशेष योजना, तसेच शिक्षण आणि प्रशिक्षणाकरता महाज्योती आणि सारथीमार्फत योजना राबवल्या जातील, असंही फडनवीस यावेळी म्हणाले.

**<><><><>**

राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या स्पेक्स २०३० या प्रकल्पामुळे मुलांचं शिक्षण, तरुणांसाठी रोजगार आणि संपूर्ण समाजाच्या जीवनात सकारात्मक बदल घडेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला. गडचिरोलीसारख्या आदिवासी आणि मागास जिल्ह्यांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती आणि उपचार पोहोचवण्यासाठी, तसंच तिथल्या नागरिकांना परवडणाऱ्या आणि चांगल्या नेत्रसेवा उपलब्ध करून देण्यावर भर देत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

तरुणांमध्ये रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी श्रम आणि रोजगार मंत्रालयानं केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या उपस्थितीत आज एका खासगी कंपनीशी सामंजस्य करार केला. रोजगार निर्मिती हा बळकट आणि आत्मनिर्भर भारताचा एक महत्त्वपूर्ण स्तंभ असल्याचं प्रतिपादन मांडवीय यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने या कराच्या रचनेत नुकतेच क्रांतिकारी बदल केले. यातल्या काही बाबींविषयी सविस्तर माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड.. व्हॉईस कास्ट**

*(वाहतुकीवरचा खर्च कमी करण्याच्या उद्देशाने सरकारने वाहन आणि वाहतुकी संदर्भातल्या इतर आवश्यक घटकांवरच्या करात घट केली आहे. त्यानुसार, १० आणि त्यापेक्षा जास्त*

*आसन संख्या असलेली खासगी वाहनं, बाराशे सीसी पेक्षा कमी इंजिन क्षमता असलेली पेट्रोल, एलपीजी किंवा सीएनजी वाहनं तसंच दुहेरी इंधन क्षमतेची वाहनं, पंधराशे सीसी पेक्षा कमी इंजिन क्षमता असलेली डिझेलवर चालणारी वाहनं, अद्ययावत रुग्णवाहिकेसाठी लागणारं साहित्य, रिक्षा, वस्तुंची वाहतूक करणारी वाहनं यांवरचा जीएसटी २८ टक्क्यावरून १८ टक्के करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना उपयोगी ठरणाऱ्या ट्रॅक्टरच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या साहित्यावरचा कर १८ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. संरक्षण क्षेत्रात वापरले जाणारे रणगाडे आणि तत्सम संरक्षक वाहनं आणि त्यांच्यातल्या साहित्यावरचा तसंच, शेतीसाठी लागणारे स्वयंचलित ट्रेलर्स, बैल किंवा घोडागाडी यांच्यावरचा कर १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे.)*

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं भाजपा खासदारांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या सांगता समारंभाला संबोधित करणार आहेत. उद्या होणाऱ्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेचं मूलभूत प्रशिक्षण खासदारांना देण्यासाठी कालपासून ही कार्यशाळा घेण्यात आली. प्रधानमंत्री सर्व प्रशिक्षण सत्रांमध्ये उपस्थित होते, अशी माहिती केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. संयुक्त लोकशाही आघाडीतल्या इतर पक्षांचे खासदारही आज कार्यशाळेत सहभागी होतील.

**<><><><>**

उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. रालोआचे उमेदवार, महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन आणि इंडिया आघाडीचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांच्यात लढत होणार आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य या निवडणुकीत मतदान करतील. लोकसभेचे ५४२ आणि राज्यसभेचे २३९ सदस्य मिळून ७८१ सदस्य उपराष्ट्रपतीपदासाठी मतदान करणार आहेत. विजयासाठी ३९१ मतांची आवश्यकता आहे.

**<><><><>**

राष्ट्रीय तपास यंत्रणेनं दहशतवादाच्या कटाच्या तपासादरम्यान पाच राज्यं आणि जम्मू-काश्मीरमध्ये एकंदर २२ ठिकाणी छापे टाकले. बिहारमधल्या आठ, कर्नाटक,

तमिळनाडू आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी एक, उत्तर प्रदेशातल्या दोन आणि जम्मू-काश्मीरमधल्या दोन ठिकाणी एनआयएनं ही कारवाई केली.

<><><><>

जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमधे झालेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला, तर एक जवान जखमी झाला आहे. जखमी जवानाला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. कुलगाम जिल्ह्यातल्या गुड्डर परिसरात दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोधमोहीम सुरू केली होती, दहशतवाद्यांच्या ठिकाणापर्यंत सुरक्षा दलाचे जवान पोहोचताच दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला. त्याला सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिलं.

<><><><>

भारताच्या पुरुष हॉकी संघानं काल आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या अजिंक्यपदाला गवसणी घातली. अंतिम सामन्यात भारताने दक्षिण कोरियावर ४-१ असा विजय मिळवला. भारताकडून दिलप्रीत यानं दोन, तर सुखजीत आणि अमित रोहिदास यांनी प्रत्येकी एक गोल केला. या विजयासोबतच भारताचा संघ पुढच्या वर्षी होणाऱ्या एफआयएच पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या यशाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हॉकी संघाचं अभिनंदन केलं. गतविजेत्या दक्षिण कोरियाला भारतानं हरवल्यामुळे हा विजय आणखी विशेष असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात नमूद केलं. भारतीय हॉकी आणि क्रीडाविश्वासाठी हा अभिमानाचा क्षण असल्याचंही ते म्हणाले.

<><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत कार्लोस अल्काराज यानं यानिक सिनर याच्यावर ६-२, ३-६, ६-१ ६-४ अशी मात करून जेतेपदावर नाव कोरलं. अप्रतिम खेळाचं प्रदर्शन करत त्यानं ४२ विनर्स, आणि १० एसेस फटकावले. संपूर्ण सामन्यात त्यानं एकदाही डबल फॉल्ट केला नाही. कार्लोस याचं या स्पर्धेतलं हे दुसरं, तर कारकीर्दीतलं सहावं ग्रँडस्लॅम जेतेपद आहे.

<><><><>

बिहारमध्ये विशेष मतदार याद्या पुनरीक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्य बागची यांच्यासमोर आज

पुन्हा सुनावणी होत आहे. या प्रक्रियेअंतर्गत प्रसिद्ध केलेल्या मसुदा मतदार याद्यांवर १ सप्टेंबरची मुदत संपल्यानंतर आलेले दावे आणि हरकतीही विचारात घेऊ, असं निवडणूक आयोगानं सांगितल्यानंतर ही मुदत वाढवायला या पीठानं गेल्या आठवड्यात नकार दिला होता.

**<><><><>**

भंडारा जिल्ह्यात साकोली इथं ई-रिक्षाला भरधाव वेगानं जाणाऱ्या गाडीनं धडक देऊन झालेल्या अपघातात नऊ महिला जखमी झाल्या. हा अपघात काल संध्याकाळी झाला. या सर्व महिला शेतातलं काम आटोपून घरी निघाल्या असताना हा अपघात झाला. साकोली इथल्या उपजिल्हा रुग्णालय जखमींना दाखल केलं. त्यानंतर त्यांना भंडाऱ्याला नेण्यात आलं.

**<><><><>**

परभणी जिल्ह्यात धारणगाव इथं ई-पीक पाहणीला गेलेल्या एका तरुण शेतकऱ्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. नदीतून शेताकडे जात असताना पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात पडला. या घटनेची माहिती मिळताच त्याच्या कुटुंबासह जिल्हा प्रशासनाने शोध कार्य सुरू केलं. मात्र, त्याचा मृतदेह घटनास्थळापासून पुढे काही अंतरावर असलेल्या समसापूर बंधाऱ्यात सापडला.

**<><><><>**

ज्येष्ठ पत्रकार आणि द टेलिग्राफ या दैनिकाचे संपादक संकर्षण ठाकूर यांचं आज गुरूग्राम इथे निधन झालं. ते ६३ वर्षांचे होते. ठाकूर यांनी इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी दैनिकासह अनेक दैनिकांमध्ये संपादकीय पदं भूषवली. पत्रकारितेतल्या जगातला एक निर्भय माणूस गमावला आहे, असं प्रेस क्लब ऑफ इंडियाने आपल्या समाज माध्यमावरच्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

**//<><><><>//**